**ठळक बातम्या**

- युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला ३ कर्तव्यांवर भर देणारा अर्थसंकल्प निर्मला सीतारामन यांच्याकडून लोकसभेत सादर

- शहरी आर्थिक क्षेत्र विकास, मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वे, महिला बचत गटांच्या वस्तूंसाठी स्वतंत्र दुकानं, खादी आणि हातमागासाठी महात्मा गांधी ग्राम स्वराज उपक्रमाची घोषणा

- एप्रिलपासून नवीन प्राप्तिकर कायदा, शेअर बाजारावरच्या नव्या करांमुळं मोठी घसरण

- विकसित भारताच्या गरुडझेपेचा हा अर्थसंकल्प असल्याची प्रधानमंत्र्यांची प्रतिक्रिया, राज्यासाठीच्या घोषणांचं मुख्यमंत्र्यांकडून स्वागत

**आणि**

- थायलंड इथं झालेल्या जागतिक बॅडमिंटन महासंघाच्या सूपर थ्री हंड्रेड स्पर्धेत भारताच्या देविका सिहागनं पटकावलं महिला एकेरीचं विजेतेपद

**<><><><><><>**

देशातल्या युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत सादर केला. त्यात आर्थिकवृद्धीदर वाढवणं, नागरिकांचं कौशल्य विकसित कर आणि सर्व नागरिकांना सोयीसुविधा, सवलतींचा पुरेपूर लाभ देणं, या ३ कर्तव्यांवर आधारित हा अर्थसंकल्प असल्याचं त्या म्हणाल्या.

२०२६- २७ या आर्थिक वर्षासाठी साडेत्रेपन्न लाख कोटींचा हा अर्थसंकल्प आहे. या वर्षात सरकारला साडे छत्तीस लाख कोटी रुपये एकूण महसूल मिळेल, त्यातले २८ लाख ७० हजार कोटी रुपये करवसुलीतून मिळतील. येत्या आर्थिक वर्षात

वित्तीय तूट ४ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील, असा अंदाज आहे. चालू आर्थिक वर्षात ती ४ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. चालू आर्थिक वर्षासाठीचा करसंकलनाचा सुधारित अंदाज ३४ लाख कोटी तर खर्चाचा सुधारित अंदाज ४९ लाख ६० हजार कोटी रुपये इतका व्यक्त केला आहे.

१६व्या वित्त आयोगाचा अहवालही त्यांनी आज लोकसभेत सादर केला.

**<><><><><><>**

यंदाच्या अर्थसंकल्पात सिटी इकॉनॉमिक रिजन अर्थात शहरी आर्थिक क्षेत्रांचा विकास करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. त्यासाठी प्रत्येक क्षेत्राला ५ वर्षात ५ हजार कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. याशिवाय दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतली शहरं, तसंच तीर्थस्थळांवर लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. यासंदर्भातल्या इतर घोषणा जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हिसी शहरे- तुषार**

*(देशभरात दळणवळण सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशानं विविध महानगरं जोडणाऱ्या रेल्वेच्या ७ हायस्पीड कॉरिडॉर्सची घोषणा आज केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केली. मुंबई - पुणे, पुणे -हैद्राबाद, हैद्राबाद - बंगळुरू, हैद्राबाद - चेन्नई आणि चेन्नई - बंगळुरू तसंच दिल्ली- वाराणसी आणि वाराणसी - सिलिगुडी या मार्गांचा त्यात समावेश आहे.*

*देशातल्या महत्त्वाच्या औद्योगिक कॉरिडॉर्सच्या जवळ ५ शैक्षणिक परिसर विकसित करायची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. विविध विद्यापीठं, महाविद्यालयं, संशोधन संस्था, कौशल्य केंद्रांची संकुलं इथं सुरू होतील. विज्ञान, तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि गणित या क्षेत्रांमध्ये विद्यार्थिनींचा सहभाग वाढवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात त्यांच्यासाठी वसतीगृह सुरू केलं जाणार आहे.*

*मुंबईतल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीजच्या माध्यमातून १५ हजार माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये एव्हीजीसी कंटेंट क्रिएटर लॅब्स सुरू केल्या जाणार आहेत.*

*ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधा पुरवणाऱ्यांना योग, तसंच वैद्यकीय उपकरणं वापरण्याचं प्रशिक्षण देऊन येत्या काळात अशा दीड लाख काळजीवाहकांना प्रशिक्षित करायचं ध्येय अर्थमंत्र्यांनी*

*आज जाहीर केलं. आयुर्वेदाला चालना देण्यासाठी ३ नव्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्थांची स्थापना केली जाणार आहे. पशुवैद्यकीय क्षेत्रातही अतिरिक्त महाविद्यालयं सुरू केली जाणार आहेत.*

*दिव्यांग नागरिकांना माहिती तंत्रज्ञान, AVGC, आदरातिथ्य, खाद्यपेय क्षेत्रात संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारमार्फत विशेष प्रशिक्षण दिलं जाणार आहे. दिव्यांग सहारा योजना सुरू करुन या नागरिकांना कृत्रिम अवयव पुरवणं, त्यांच्यासाठी विशेष मॉल सुरू करणं यासह विविध योजना सरकार राबवणार आहे. निवडक २० पर्यटनस्थळांवर १० हजार गाईड्स करता प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव त्यांनी अर्थसंकल्पात मांडला आहे. )*

**<><><><><><>**

लखपती दीदींच्या धर्तीवर महिला बचत गटांसाठी शी मार्ट्स सुरू करण्याची घोषणा या अर्थसंकल्पात आहे. खादी, हातमाग आणि हस्तकला क्षेत्राला बळकटी देण्यासाठी, त्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्यासाठी आणि ब्रँडिंगसाठी महात्मा गांधी ग्राम स्वराज उपक्रम राबवण्याचा प्रस्ताव यंदाच्या अर्थसंकल्पात आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या मदतीसाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये कॉर्पोरेट मित्र ही व्यवस्था उभारण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली. मच्छिमारीला प्रोत्साहन देण्यासाठी ५०० सरोवरांचा विकास केला जाणार आहे. कृषी,उद्योग आणि क्रीडा क्षेत्रासाठीच्या इतर घोषणांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड व्हाइस कास्ट कृषी तुषार***

*(नारळ, चंदन, काजू, कोको यासारखं चांगलं उत्पन्न देणाऱ्या पीकांना किनारी भागात तर बदाम, अक्रोड यासारख्या पीकांना डोंगराळ भागात प्रोत्साहन देण्याचा सरकारचा मानस आहे. विशेष नारळ प्रोत्साहन योजना यंदा सरकार राबवणार आहे.*

*पुढच्या पाच वर्षांत बायोफार्मा शक्ती कार्यक्रमासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद आणि पाच प्रादेशिक वैद्यकीय केंद्रं स्थापन करण्यासाठी राज्यांना मदत करण्यासाठी योजना सुरू केली जाईल अशी घोषणा त्यांनी केली. कर्करोग आणि मधुमेह यांसारख्या असंसर्गजन्य रोगांवरच्या उपचाराकरता स्वस्त दरात दर्जेदार औषधं उपलब्ध करून देण्यासाठी या बायोफार्मा शक्ती कार्यक्रमांतर्गत एक हजारापेक्षा जास्त मान्यताप्राप्त भारतीय वैद्यकीय चाचणी प्रकल्प व्यवस्थांचं जाळं तयार करण्याची घोषणा त्यांनी केली.*

*खेलो इंडिया कार्यक्रमाला चालना देण्यासाठी आगामी दशकभराच्या काळात प्रशिक्षण केंद्रं आणि प्रशिक्षकांच्या पद्धतशीर विकासावर लक्ष भर असलेलं खेलो इंडिया अभियान सुरू करण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. प्रशिक्षकांना*

*उच्च श्रेणीच्या खेळाडूंप्रमाणेच आर्थिक मदत मिळावी यासाठी लक्ष्य ऑलिंपिक पोडियम योजना सुरू करण्याचा सरकारचा विचार आहे. )*

**<><><><><><>**

येत्या नवीन आर्थिक वर्षापासून देशात नवीन प्राप्तिकर कायदा लागू होणार आहे. त्यात प्राप्तिकराचे नियम आणि परताव्याचे अर्ज सुलभ केले असून लवकरच ते उपलब्ध होतील. सर्वसामान्य नागरिकांना सुलभरित्या भरता येतील अशा रितीने हे अर्ज तयार केल्याची माहिती निर्मला सीतारामन यांनी दिली. या आणि इतर करतरतुदी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड - व्हॉईसकास्ट- तुषार**

*आयटीआर १ आणि आयटीआर २ हे अर्ज भरणाऱ्यांना ३१ जुलै पर्यंतच हे अर्ज भरावे लागतील. इतरांना मात्र ३१ ऑगस्टपर्यंत मुदत वाढवून मिळणार आहे. सुधारित आयकर विवरण पत्र आता नाममात्र शुल्क भरुन ३१ डिसेंबर ऐवजी ३१ मार्चपर्यंत भरता येईल. शेअर बाजारात गुंतवणूक असणाऱ्यांना आता डिपॉझिटरीकडे एकदाच १५ जी किंवा १५ एच अर्ज भरता येणार. हाच अर्ज गुंतवणूक केलेल्या सर्व कंपन्यांना पुरवला जाईल. याशिवाय टीसीएस, टीडीएस यातही काही सुधारणांची घोषणा आजच्या अर्थसंकल्पात झाली. तसंच करचोरीच्या काही प्रकरणांमध्ये दंड भरुन नागरिकांना मुक्त होता येणार आहे. सहकारी संस्था, माहिती तंत्रज्ञान कंपन्या, डेटा सेंटर स्थापन करणाऱ्या कंपन्यांना आयकरात सवलत जाहीर झाली आहे.*

*देशातल्या बँकिंग क्षेत्राचा आढावा घेण्यासाठी आणि विकसित भारताच्या दृष्टीनं त्यांना सक्षम करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. परकीय चलन व्यवस्थापनांच्या नियमांचा आढावा घेण्याची घोषणाही त्यांनी केली. रोखे बाजारात सुधारणा, १ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे रोखे आणणाऱ्या महापालिकांना १०० कोटी रुपयांचा निधीही केंद्र सरकार देणार आहे.*

*शेअर बाजारातल्या फ्युचर आणि ऑप्शनमध्ये व्यवहार करणाऱ्यांना आता पूर्वीपेक्षा अधिक दरानं कर द्यावा लागेल. फ्युचरसाठी हा कर २ शतांश टक्क्यावरुन ५ शतांश टक्के झाला आहे. तर ऑप्शनसाठी हा कर सध्या १ दशांश टक्क्यांवरुन १५ शतांश टक्के होणार आहे. सर्वप्रकारची समभाग पुनर्खरेदीतून मिळणारा नफा आता कॅपिटल गेन म्हणून गृहित धरला जाणार आहे.*

*मत्स्य निर्यात, चामडे आणि वस्त्रोद्योगाला निर्यातीसाठी विविध प्रकारच्या करसवलती अर्थमंत्र्यांनी आज जाहीर केल्या. या उद्योगांसाठी लागणाऱ्या काही वस्तूंच्या आयातीवरही कुठलाही कर लागणार नाही, असंही त्यांनी आज जाहीर केलं. अणूऊर्जा प्रकल्पांचे साहित्य, लिथियम आयन बॅटरी, सौर उपकरणांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या वस्तू, दुर्मिळ खनिजं, विमान निर्मितीसाठीचे सुटे भाग, आयातीवरच्या शुल्कातही आज सवलत जाहीर झाली. मायक्रोवेव्ह ओव्हनसाठी लागणाऱ्या काही वस्तू मूलभूत उत्पादन शुल्क मुक्त झाल्यानं स्वस्त होणार आहेत. व्यक्तीगत वापरासाठी आयात केलेल्या वस्तूंवर आता २० ऐवजी १० टक्के आयात शुल्क लागेल. त्याचवेळी कर्करोगाच्या १७ औषधांना सीमा शुल्कातून सवलत मिळाली आहे. सीमा शुल्कासंबंधीच्या विविध प्रक्रिया तसंच कार्गो हाताळणीची प्रक्रिया सुलभ करण्याची घोषणाही अर्थमंत्र्यांनी आज केली.*

**<><><><><><>**

अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर शेअर बाजारात मोठी घसरण दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स एक हजार पाचशे सत्तेचाळीस अंकांनी घसरुन ८० हजार ७२३ अंकावर बंद झाला, तर निफ्टी ४९५ अंकांनी घसरून २४ हजार ८२५ अंकांवर बंद झाला.

**<><><><><><>**

यंदाचा अर्थसंकल्प हा २०४७च्या विकसित भारताच्या गरुडझेपेचा हा एक सशक्त आधार असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. सुधारणांच्या प्रक्रियेला उर्जा आणि गती देण्याचं काम हा अर्थसंकल्प करणार आहे, असं ते म्हणाले.

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री**

उत्पादन ते पायाभूत सुविधा, आरोग्य ते पर्यटन, ग्रामीण भाग ते कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत हा अर्थसंकल्प तरुण, महिला आणि शेतकऱ्यांच्या आत्मनिर्भर भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी बळ देतो, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले. हा अर्थसंकल्प गावांचं, गरिबांचं, शेती आणि शेतकऱ्यांचं भवितव्य बदलेल, अशी प्रतिक्रिया केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिली. या अर्थसंकल्पात कृषी आणि संलग्न क्षेत्रांसाठी १ लाख ६२ हजार ६७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचं चौहान म्हणाले. हा अर्थसंकल्प दूरसंचार, उत्पादन क्षमता आणि प्रादेशिक संतुलनावर लक्ष केंद्रित करतो अशी प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. या अर्थसंकल्पात इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर उत्पादनासह निर्मिती क्षेत्रावर भर देण्यात आला आहे, असं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

यंदाचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या स्वप्नाच्या दिशेने जाणारं एक दमदार पाऊल असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे.

अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती तसंच सात विविध प्राधान्य क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीला चालना मिळणार आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले..

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री**

राज्यात सेमीकंडक्टर आणि बायोफार्मा क्षेत्रासाठी मोठी तरतूद, शी मार्टच्या माध्यमातून लखपती दीदींना उद्योजिका बनवण्याचा निर्णय यांसह अनेक भरीव तरतुदी यंदाच्या अर्थसंकल्पात आहे. त्यामुळे राज्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळाल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. हा अर्थसंकल्प विकसित भारताचा पाया रचणारा आणि युवाशक्तीला बळ देणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली आहे. जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर असताना भारताच्या अर्थव्यवस्थेत सातत्य, स्थिरता आणि गतिमानता कायम ठेवण्याचे सरकारचे प्रयत्न यंदाच्या अर्थसंकल्पात दिसून आल्याचं खासदार अशोक चव्हाण म्हणाले. तर या अर्थसंकल्पात मुंबईसाठी मोठ्या घोषणा केल्या असल्यानं उद्योग आणि विकासाला चालना मिळेल, असं भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या खऱ्या समस्यांकडे या अर्थसंकल्पानं कानाडोळा केला असल्याची प्रतिक्रिया लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिली आहे. तर या अर्थसंकल्पात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय आव्हानांवर कुठलाही पर्याय सुचवलेला नसल्याचं राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले.

**होल्ड.. बाईट - मल्लिकार्जुन खरगे**

आज सादर झालेला अर्थसंकल्प राज्याच्या जखमांवर मीठ चोळणारा असून सर्वाधिक कर देणारा महाराष्ट्र आज पुन्हा रिकाम्या हातानं उभा आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. तर या

अर्थसंकल्पामुळे समाजातल्या कुठल्याही घटकाचं समाधान झालेलं नाही. यात फक्त आकड्यांची जुमलेबाजी असून तो पूर्णतः दिशाहीन असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला दुर्लक्षित ठेवणारा असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे यांनी केला आहे. मुंबई-पुणेसह ७ मार्गांवर हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरचा खर्च केंद्र सरकार करणार की राज्य सरकार, याचा खुलासा केंद्र सरकारनं करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

**<><><><><><>**

भारताची बॅडमिंटनपटू देविका सिहाग हीनं थायलंड इथं झालेल्या जागतिक बॅडमिंटन महासंघाच्या सूपर थ्री हंड्रेड स्पर्धेत महिला एकेरीचं जेतेपद पटकावलं. अंतिम सामन्यात मलेशियाची प्रतिस्पर्धी गोह जीन वेई हीनं दुखापतीमुळं अर्धवट सामन्यातून माघार घेतली. त्यावेळी देविकानं पहिला गेम २१-८ असा जिंकला होता, तर दुसऱ्या गेममध्ये ती ६-३ अशी आघाडीवर होती. देविकाचं हे पहीलंच विजेतेपद ठरलं आहे.

**<><><><><><>**

ढोलकी सम्राट पांडुरंग घोटकर यांना जालना इथं जेईएस महाविद्यालयाच्या वतीनं पहिला 'जेईएस कलासाधना पुरस्कार' देऊन सन्मानित केलं गेलं.

लोककला क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि निष्ठावान कार्य करणाऱ्या कलाकारांचा गौरव करण्यासाठी महाविद्यालयानं हा नवा उपक्रम सुरू केल्याची माहिती प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी दिली. लोककलेची परंपरा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणं हेच माझ्या जीवनाचं ध्येय असल्याचं, पुरस्काराला उत्तर देताना पांडुरंग घोटकर यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात संत रोहिदास महाराज जयंती निमित्त आज विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. खामगाव शहरांत आज भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत राज्याचे कॅबिनेट कामगार मंत्री आकाश फुंडकर आणि शेकडोंच्या संख्येनं शहरातले चर्मकार बांधव या शोभा यात्रेत सहभागी झाले होते.

<><><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या विचारांवरच पक्ष पुढं नेण्याची भूमिका कायम राहील असं पक्षाचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे. दिवंगत अजित पवार यांच्या अस्थिकलश पूजनासाठी आज ते मुंबईत प्रदेश कार्यालयात आले असताना बातमीदारांशी बोलत होते. भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधे सामील होण्याचा निर्णय दिवंगत पवार यांनी विचारपूर्वक  घेतला होता, त्याच्याशी पक्ष ठाम राहील, असं ते म्हणाले.

<><><><><><

येत्या दोन दिवसात राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><><>//